# कॅप्टन

सकाळी कोर्ट सुरू झाले म्हणजे पहिल्या तासाभरात खूपच गडबड असे. आज कोणती कामे चालणार आणि कोणती चालू शकणार नाहीत याचा वकिलांना बोलावून अंदाज घेउन न चालणारी कामे वाढवली जात आणि त्यात पुढच्या तारखा दिल्या जात. जामीनाचे अर्ज किंवा तात्पुरत्या मनाई हुकूमाचे अर्ज दाखल केले जात. काहींची सुनावणी होई आणि मग सुनावणी होणाऱ्या मोठ्या प्रकरणाला सुरुवात होई. आज माझे एकच किरकोळ अपील जिल्हा न्यायाधीशासमोर चालले होते. नंतर त्यांच्याकडे खुनाच्या एका खटल्याची सुनावणी सुरू झाली आणि ती दिवसभर चालणार होती. दिवाणी न्यायाधीशाकडे एक दावा निघणार होता; पण तो दुपारी निघण्याचा अंदाज होता. शिवाय त्या कोर्टात माझा एक ज्युनियर लक्ष ठेवण्यासाठी बसलेलाच होता. थोडा निवांत वेळ होता. चहा घ्यावा असा विचार केला.

न्यायालयाच्या आवारातच एका कोपऱ्यात 'उपहारगृह' पाटी मिरवणारी एक पत्र्याची टपरी होती. पायऱ्या उतरून त्या दिशेने निघालो. जाता जाता सहज डावीकडे लक्ष गेले. पोलिसांनी न्यायालयात हजर करण्यासाठी आणलेले आरोपी आणि त्यांच्याबरोबरचे रक्षक आवारातल्या झाडाखालीच बसत. इमारतीत त्यांना वेगळी जागाच नव्हती. पोलिसांनी आज आणलेल्या आरोपीना पाहिले आणि एकदम चमकलो. त्यातला एक होता कॅप्टन.

हातकड्या घातलेल्या कॅप्टनने मला पाहून मान खाली घातली. एक सालस आणि सरळ वागणारा म्हणून मी त्याला ओळखत होतो. गावात मोटारी फारशा नव्हत्याच. सायकलरिक्षा हेच मुख्य वाहन होते. गावातल्या अरुंद रस्त्यातून फिरायला ते सोयीचेही असे. रिक्षा चालवणारा कॅप्टन बहुतेक मध्यमवर्गीय सुखवस्तू घरात माहीत होता. एक विश्वासू म्हणून त्याची ओळख होती. घरची बायकामुले सिनेमाला पाठवायची असतील किंवा गावाबाहेर मैलभर दूर असलेल्या खंडेश्वरीला त्यांना दर्शनाला जायचे असेल किंवा एखाद्या बाळंतीणिला सटवाईच्या पूजेसाठी जायचे असेल तर कॅप्टनला निरोप जाई. तो मोकळा असेल तर ताबडतोब येई. ठरलेल्या वेळी घेउन जाई आणि आणून सोडे. लहान मुले पाहिली म्हणजे तो खुलायचा. त्यांच्याशी त्याची गट्टी असे. अनेक घरातली मुले त्याच्या ओळखीची झाली होती. तो आला म्हणजे मुलांना रिक्षातून एक चक्कर मारून आणावे लागे. तो त्यांचा करच असे.

कॅप्टन हे काही त्याचे खरे नाव नव्हते. ते बहुधा गफूर असावे. पण ते नाव विस्मृतीत गेले होते. सैन्यात वापरल्या जाणाऱ्या टोपीसारखी एक टोपी त्याने कुठून तरी पैदा करून वापरायला सुरवात केली आणि त्या टोपीवरून त्याला कोणी तरी 'कॅप्टन' संबोधले. तेच नाव गावात ज्याच्या त्याच्या तोंडी झाले.

अगदी साधे पण स्वच्छ कपडे वापरणारा, नीटनेटका राहणारा कॅप्टन वागायला अतिशय नम्र असे. गावातल्या चांगल्या माणसांशी आपली ओळख असावी, त्यांनी आपल्याला चांगला म्हणावे एवढीच त्याची माफक अपेक्षा असे. बायकामुलांना त्याने घरी आणून सोडल्यावर थोडे रिकामपण असेल तर त्याला थांबायला सांगून घरात चहा टाकला जाई. त्याच्या शाळेत जाणाऱ्या मुलीची वास्तपुस्त केली जाई. एखादी गृहिणी आपल्या मुलीचे लहान झालेले चांगले कपडे त्याच्या मुलीसाठी देई. चहा घेउन कॅप्टन परत जाई. आपल्याला एक विशेष वागणूक दिली जाते, इतर रिक्षाचालकांपेक्षा आपला दर्जा वेगळा आहे असे त्याला वाटे.

हातकड्या घातलेल्या अवस्थेत पोलिसांनी त्याला कोर्टात कशाकरता आणले असेल? त्याच्या हातून कोणता गुन्हा घडला असेल? काहीच अंदाज बांधता येईना. मी त्याच्याजवळ गेलो आणि काय झाले असे त्याला विचारले.

जुन्नरकर न्यायाधीशांच्या घरी येण्याला दोन दिवसांपूर्वी त्याला बोलावले होते. साहेबांच्या पत्नी आणि त्यांची छोटी मुलगी यांना सिनेमाला जायचे होते. संध्याकाळी तो वेळेवर बाईसाहेबांना आणायला बंगल्यावर गेला. त्यांना

सिनेमागृहात पोहोचवून परत सिनेमा सुटल्यावर न्यायला आला. तेथून त्याने त्यांना घरी पोहोचवले. नंतर दुसऱ्या दिवशी दुपारी जुन्नरकरांचा चपराशी त्याला शोधत आला. बाईसाहेबांनी बोलावले आहे असा निरोप त्याने दिला. कॅप्टन साहेबांच्या घरी गेला तर बाईसाहेब रागाने तणतणत होत्या. "नेहाच्या कानात सिनेमाला जाताना डूल होते आणि परत तू आणून सोडलेस तेव्हा तिच्या एका कानात डूल नव्हता. तो कोठे गेला ते सांग." असे बाईसाहेब विचारत होत्या.

"मला काय माहीत डूल कुठे गेला? मी तर तिच्या कानाकडे पाहिलेसुद्धा नव्हते." हादरलेला कॅप्टन थरथरत उत्तर देत होता. पण बाईसाहेब ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हत्या. "तू नाही काढून घेतला तर कोण घेणार? आम्ही सिनेमालाच फक्त गेलो. नंतर बाहेर कुठे गेलोच नाही, सिनेमाला तर तुझ्याच रिक्षात गेलो. मग डूल कोण काढून घेणार?" बाईंच्या या युक्तिवादाला त्याच्याजवळ उत्तर नव्हते.

पुष्कळ गयावया करून त्याने आपण निर्दोष असल्याचे बाईसाहेबांना सांगण्याचा प्रयत्न् केला; पण त्यांचा ग्रह बदलला नाही. कॅप्टन कबूल होत नाही हे पाहून बाईंनी लगेच घरूनच पोलिस ठाण्यावर फोन केला. पोलिस आले आणि कॅप्टनला घेउन गेले. दिवसभर विचारपूस करून, पोलिसांच्या पद्धतीनुसार थोडी मारझोड करून, त्यांनी कॅप्टनला न्यायालयात हजर करण्यासाठी आणले होते.

त्याच्या डोळ्यात पाणी होते. 'साहेब मी अस कसं करीन?' तो काकुळतीने विचारत होता. कॅप्टन चोरी करील आणि त्यातही लहान मुलीच्या कानातले डूल काढून घेउन हे मला पटतच नव्हते.

चहा घ्यायचा मूडच राहिला नव्हता. मी कोर्टाच्या इमारतीकडे परत वळलो. लगेच निघणारे काहीच काम नव्हते; तेव्हा नाजरच्या खोलीत जाउन थोडावेळ बसावे असा विचार केला. थोडे दूर असलेल्या बाररूमपर्यंत जाण्याऐवजी नाजरच्या खोलीत बसणे आम्हा वकिलांना सोयीचे असे. नाजरची खोली थोडी मोठी होती. नाजर आणि त्यांचा एक मदतनीस बसूनही बरीच जागा मोकळी राही. त्यात तीन-चार खुर्च्या आणि एक बाक ठेवलेले असे. तेथे बसले म्हणजे कोणत्याही कोर्टात झालेली पुकार ऐकू येई आणि बाजूलाच असलेल्या कोर्टात लगेच जाता येई. शिवाय रिकामे असलेले एक-दोन वकीलही तेथे बसलेले असत, त्यांच्याशी गप्पाही होत.

जुन्नरकर साहेबांच्या मुलीचा एक डूल हरवल्याची बातमी कोर्टातल्या बहुतेक कर्मचाऱ्यांना ठाउक झाली होती. तशी डूल हरवणे ही फारच छोटी गोष्ट होती; पण तिला महत्त्व प्राप्त झाले होते. मी गेलो तेव्हा कांतराव नाजर आणि त्यांचा मदतनीस कारकून यांचे त्याबद्दलच बोलणे चालू होते. आम्ही वकील जसे कॅप्टनला ओळखत होतो तसेच न्यायालयातले कर्मचारीही त्याला ओळखत होते. चोऱ्यामाऱ्या करणाऱ्यापैकी तो नाही, उलट प्रामाणिक आहे. रिक्षात विसरलेल्या काही वस्तू त्याने पूर्वी आणून दिलेल्या आहेत. साहेबांच्या मुलीचा डूल तो काढून घेणे तर शक्यच नाही; डूल टॉकीजमध्ये किंवा घरीच कुठे तरी पडला असावा. असे त्यांचेही मत होते.

आपल्या अवजड शरीरामुळे मुलीला कडेवर घेउन रिक्षात बसणे बाईसाहेबांना शक्यच नव्हते. त्यामुळे बाईसाहेब रिक्षात बसल्यावर व्हरांड्यात उभ्या असलेल्या नेहाला कॅप्टनने उचलून त्यांच्या शेजारी बसवले. सिनेमागृहात पोहोचल्यावर बाईसाहेब आपल्या खुर्चीवर बसेपर्यंत नेहाला त्यानेच उचलून घेतले होते. सिनेमा संपल्यावर लगबगीने आत जाउन त्याने नेहाला उचलून बाहेर आणले. बाईसाहेब हळूहळू पायऱ्या उतरत रिक्षाकडे गेल्या. रिक्षात त्या बसल्यावर नेहाला त्यांच्या शेजारी बसवून कॅप्टनने बंगल्याकडे रिक्षा नेला होता. एवढ्या अवधीत डूल काढून कसे घेणार? तरीही त्यानेच डूल काढून घेतले असे बाईसाहेबांचे ठाम मत होते.

स्वत: जुन्नरकरसाहेब फार गरीब स्वभावाचे आणि सरळ वागणुकीचे. त्यांना बाईसाहेबांना दुखावण्याची अजिबात ताकद नव्हती. या प्रकरणात त्यांनी स्वत: अजिबात दखल दिली नव्हती. बाईसाहेबच पुढाकार घेउन

डुलाची चौकशी करीत होत्या. बाईसाहेबांचे वडील जिल्हाधिकारी होते. लहानपणापासून जबरदस्त आत्मविश्वास असलेल्या बाईसाहेब आता न्यायाधीशसाहेबांची पत्नी झाल्या होत्या. आत्मविश्वासाच्या जोडीला थोडासा उर्मटपणाही आला होता.

फौजदारी कामेच नेहमी चालवणाऱ्या माझ्या एका मित्राने कॅप्टनतर्फे वकीलपत्र दाखल केले. पोलिसांनी चौकशीसाठी दोन दिवसाची पोलिस कोठडी मागितली. दंडाधिकाऱ्यांनी ती दिली आणि पोलिस कॅप्टनला घेउन गेले.

तिसऱ्या दिवशी पोलिस त्याला घेउन कोर्टात आले तेव्हा कॅप्टनच्या हातात हातकडी नव्हती. पोलिस त्याला सोडून देउ इच्छित होते हे तर त्यावरून स्पष्टच होते. पोलिसांनी त्या दिवशी 169 चा रिपोर्ट दिला. आरोपीविरुद्ध काही पुरावा मिळत नाही म्हणून केस बंद करून आरोपीला मुक्त करावे असा अहवाल या कलमाखाली पोलिस सादर करतात. आरोपीला सोडून द्यायचे असल्यामुळे त्याला पुन्हा हातकड्या घालण्याची पोलिसांना आवश्यकता वाटत नाही. म्हणून त्यांनी कॅप्टनला मोकळेच आणले होते.

अजून दंडाधिकाऱ्यांचा हुकूम व्हायचा असल्यामुळे कॅप्टन पोलिसांच्याजवळच झाडाखाली बसला होता. मी त्याच्याजवळ जाउन 'तू सुटलास हे चांगले झाले' असे काही तरी म्हणालो. कोर्टातून सुटका झाली म्हणजे इतर आरोपी जसे आनंदित दिसतात तसा मात्र कॅप्टन दिसत नव्हता. "साहेब मी काहीच केलेले नसताना उगीच माझी बदनामी झाली. मारहाणीचे काही नाही, पण नाव खराब झाले; ते आता कसे भरून येईल?" कॅप्टनच्या प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नव्हते.

पोलिसांनी केस इतक्या लवकर बंद करण्याचा निर्णय कसा घेतला हे मला कळत नव्हते. थोड्यावेळाने जुन्नरकरांच्या घरी काम करणारा शंकर चपरासी काही कामासाठी कोर्टात आला. त्याने सांगितले की मुलीच्या कानातला एक डूल त्याची कडी नीट नसल्यामुळे पडला आणि बाईसाहेबांच्या पातळाला अडकून राहिला होता. दोन दिवसांनी पातळाचे बोळे धुवावयाला टाकताना मोलकरणीला तो दिसला आणि तिने बाईंच्या स्वाधीन डूल केला. नंतर पोलिसांना डूल सापडल्याचे कळवण्यात आले आणि केस संपवण्याचे पोलिसांनी ठरवले.

पाच- सहा दिवसांनी रस्त्यातून मी पायी जाताना मला कॅप्टन दिसला. खाली मान घालून तो शांतपणे रिक्षा चालवत होता. मी त्याला थांबण्याची खुण केली. त्याने रिक्षा थांबवला आणि मी बसलो. त्याच्या चेहऱ्यावर पूर्वी नेहमी दिसणारा आनंद आता नव्हता. रिक्षात ओळखीची सवारी असेल तर त्याच्या तोंडाची टकळी सतत चालू असे. इकडच्या तिकडच्या बातम्या तो देई. आज मात्र तो अगदी गप्प होता.

घरी पोहोचल्यावर खाली उतरलो. कॅप्टनला 'आत ये, चहा सांगतो' असे म्हणालो. तो म्हणाला, साहेब आता चहा नको. शांतपणे त्याने रिक्षा वळवला आणि दिसेनासा झाला.